# ‘विवेक’ मॅगेझिन लेखन कार्यशाळा अहवाल

इचलकरंजी: महाविद्यालयाच्या ‘विवेक’ नियतकालिक व भित्तीपत्रिकेच्यावतीने आयोजित ‘लेखन कार्यशाळा दि. १४/१२/२०१७ रोजी सकाळी १०.३० पासून घेण्यात आली. मा. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदशनाखाली पार पडलेल्या या लेखन कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक, लेखक व कवी प्रा. डॉ. रफीक सूरज मुल्ला यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी लेखनातून आपल्या भावना मांडण, म्हणण मांडण आवश्यक असून लेखन करताना काय म्हणायच आणि कस म्हणायच ह्याबद्दल चिंतन करणे गरजेचे आहे. दैनंदिनी आणि सहलीचे अनुभव लिहिणं हे सुद्धा लिहिण्याची सुरूवात होऊ शकते. आपल्या नातेवाईकांचे व्यक्तिचित्र रेखाटण्याचा प्रयत्न करावा. जवळच्या व्यक्तीची मुलाखत घेऊन त्यांच्या कार्याचे स्वरूप जाणून घेता येते. असे मार्गदर्शन डॉ. रफिक सूरज मुल्ला यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. व्ही. एस. वांद्रे होते. प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. आभार प्रा. डॉ. डी. आर तुपे यांनी मानले तर प्रा. अशोक पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी संपादक मंडळाचे सदस्य, प्राध्यापक, विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.



